POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-०८ ● मुंबई, शुक्रवार, ८ ऑगस्ट २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## ‘केम छो’ ऑर्केस्ट्रा बारवर कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्याची बदली; पोलीस आयुक्तांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह




### पोलीस दलातील कार्यप्रणाली आणि नैतिकतेवर प्रश्नचिन्ह

**केम छो बार काशिमीरा पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात असून, स्थानिक पोलीस ठाण्यानेच ही कारवाई करणे अपेक्षित होते. मात्र, त्यांनी कोणतीही ठोस कारवाई केली नाही, हे स्पष्ट आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे स्थानिक पोलीस ठाण्यातील कुठल्याही जबाबदार अधिकाऱ्यावर कोणतीही शिस्तभंगाची कारवाई झालेली नाही. नुकतेच पदभार स्वीकारलेले मीरा-भाईंदर व वसई-विरार पोलीस आयुक्त निकेत कौशिक यांच्या कार्यशैलीवर यामुळे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ज्याने बारवर यशस्वीपणे कारवाई केली, त्याची बदली; आणि जे निष्क्रीय राहिले, त्यांच्यावर कोणतीही कारवाई नाही, या दुटप्पी धोरणामुळे पोलीस दलातील कार्यप्रणाली आणि नैतिकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत.**

### मिरा भाईंदरमध्ये 30 ते 35 बार

**मिरा भाईंदरमध्ये 30 ते 35 बार आहेत. या बारना रात्री दीड वाजेपर्यंत परवानगी आहे. पण बार चालू असतात ते चार वाजेपर्यंत. या सर्व बारमध्ये प्रत्यक्षात गाणं म्हटलं जात नाही. बारबालांना सिंगर म्हणून दाखवलं जातं, पण प्रत्यक्षात वाजणारं गाणं असतं रेकॉर्डेड, आणि त्या फक्त ओठ हलवत असतात. रात्रीच्या सुमारास महिला आणि पुरुष मिळून फक्त 8 सिंगर ठेवण्याची परवानगी असते. मात्र या ठिकाणी 20 ते 25 बारबाला असतात.**

**■मीरा रोड । प्रतिनिधी,**

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गालगतच्या काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत असलेल्या ‘केम छो’ या ऑर्केस्ट्रा बारमधील अनैतिक कारवायांचे भयानक वास्तव बुधवारी उघडकीस आणले. या बातमीची दखल घेत पोलीस आणि पालिका प्रशासनाने तत्काळ कारवाई करत त्या बारमधील गुप्त दरवाजा, अरुंद बोळ आणि ‘कॅविटी रूम’ बुधवारीच उद्ध्वस्त केलं. विशेष बाब म्हणजे, अनैतिक मानवी वाहतूक कक्ष (भाईंदर विभाग) चे पोलीस निरीक्षक देविदास हंडोरे यांनी या बारवर सोमवारी कारवाई करून, पोलीस येताच वर्दी देणारा अलार्म सिग्नल, बारच्या मागील बाजूस असलेली गुप्त पळवाट आणि अन्य संशयास्पद ठिकाणांचा पदार्फाश केला होता. परंतु, ही महत्त्वपूर्ण आणि धाडसी कारवाई करणाऱ्या देविदास हंडोरे यांची बुधवारीच तात्काळ बदली करण्यात आली, ही बाब आश्चर्यजनक ठरत आहे. बारवर कारवाई करतानाचे छायाचित्र मिळाल्यामुळेच ही बदली झाली, अशी चर्चा पोलीस दलात सुरू असून, त्यामुळे अधिकाऱ्यांमध्ये संभ्रमाची परिस्थिती निर्माण झाली आहे.

## खोट्या बलात्कार प्रकरणात अडकवून मागितली 1 कोटींची खंडणी, बँक महिला कर्मचाऱ्याला अटक



**■मुंबई । प्रतिनिधी,**

आयटी प्रोफेशनलला खोट्या बलात्कार प्रकरणात अडकवून 1 कोटींची खंडणी मागितल्याची घटना मुंबईतील चारकोपमध्ये घडली आहे. याप्रकरणी खंडणी मागणाऱ्या RBL बँक महिला कर्मचाऱ्याला अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी सहा आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चारकोप पोलिसांनी ही कारवाई केली आहे.

बँक डेटाचा गैरवापर, ब्लॅकमेलिंग आणि खोट्या गुन्ह्यांचा आरोप

चारकोप पोलिसांनी मोठी कारवाई करत RBL बँकेच्या डॉली कोटक या महिलेला अटक केली आहे. तिने आपल्या माजी जोडीदाराविरुद्ध खोटा बलात्काराचा खोटा गुन्हा दाखल करुन त्याच्याकडून 1 कोटी रुपयांची खंडणी उकळण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात एकूण सहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## २४ तासांत जबरी चोरीचा छडा; वयस्कर महिलेस गळ्यातील सोनसाखळी हिसकावणारे तिघे आरोपी गजाआड!

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**



विरार (पालघर), वयस्कर महिलेला लक्ष्य करत तिच्या गळ्यातील सोन्याची चैन जबरदस्तीने खेचून चोरी करणाऱ्या तीन आरोपींना केवळ २४ तासांत अटक करून गुन्ह्याचा यशस्वी तपास लावण्यात बोळींज पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाला मोठे यश मिळाले आहे. ३० जुलै २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता, विरार पश्चिम येथील बोळींज नाक्याजवळ फियार्दी श्रीमती रंजना उदय कालेकर (वय ५३) या आपल्या नातीला शाळेत सोडून घरी पायी जात असताना, त्यांच्या मागून आलेल्या एका अनोळखी इसमाने त्यांना पत्ता विचारण्याच्या बहाण्याने थांबवले. अचानक झटापटी करत त्यांच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावून नेली. यामध्ये त्यांच्या गळ्यावर किरकोळ जखम झाली.या घटनेची नोंद बोळींज पोलीस ठाणे येथे करण्यात आली होती.

गुन्हा अनोळखी व्यक्तींनी केल्यामुळे गुन्हे प्रकटीकरण पथकाने तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज, आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू केला.

या तपासात ३ आरोपींची ओळख पटली आणि त्यांना पुढीलप्रमाणे अटक करण्यात आली:अब्दुल मोबीन इद्रिस खान (वय २८), रा. भांडुप, मुंबई, मोहम्मद झिशान अब्दुल अबरार अहमद (वय ३४), रा. चिंचणी, पालघर,दोघांना ३१ जुलै रोजी रात्री २.३० वाजता भांडुप परिसरातून अटक करण्यात आली.चेतन सुरेश वाघ ऊर्फ कोबरा ऊर्फ सैफ (वय २४), रा. दिवा, ठाणे,यास ३१ जुलै रोजी संध्याकाळी ७ वाजता दिवा परिसरातून अटक केली.

तपासादरम्यान आरोपींनी सोन्याची चैन मनप्पुरम फायनान्स लिमिटेड, कांजूरमार्ग येथे गहाण ठेवल्याची कबुली दिली.चोरीसाठी वापरण्यात आलेली ₹१ लाख किमतीची वॅगनर कार जप्त करण्यात आली.पुढील चौकशीत त्यांनी सफाळे, पालघर येथेही अशाच प्रकारचा जबरी चोरीचा गुन्हा केल्याचे कबूल केले असून, संबंधित तपास सुरू आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. निकेत कौशिक, पोलीस आयुक्त, श्री. दत्तात्रय शिंदे अपर पोलीस आयुक्त, मि.भा.वि.पोलीस आयुक्तालय, श्री. सुहास यायचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०३, विरार, श्री. विजय लगारे, सहाय्यक पोलीस आयुक्त, नालासोपारा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली बोळींज पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. प्रकाश कावळे, पोलीस निरीक्षक, श्री. प्रकाश सावंत (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउपनि/किरण वंजारी, पोउपनि/विष्णु वाघमोडे, स. फौ. जनार्दन मते, स. फौ. किशोर धनु, पोहवा/रोशन पुरकर, प्रफुल्ल सरगर, सुखराम गडाख, पो. अमं. संदिप शेळके, तांत्रिक मदत पोहया/नामदेव ढोणे पोअं/सोहेल शेख नेम. परि ०३ विरार कार्यालय व एमएसएफ जवान सागर देशमुख यांनी केलेली आहे.

## नारळी पौर्णिमेनिमित्ताने वाहतुकीत बदल

**■ठाणे । प्रतिनिधी,**



कळवा खाडी परिसरात नारळी पौर्णिमेनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असते या काळात वाहतूक पोलिसांनी शुक्रवारपासून साकेत, कळवा नाका भागात वाहतूक बदल केले आहेत.ठाणे, कळवा, मुंब्रा भागातील आगरी-कोळी समाज कळवा नाका येथे खाडी परिसरात एकत्र येतात. विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात. त्यामुळे या परिसराला जत्रेचे स्वरुप प्राप्त होते. या कालावधीत वाहतूक कोंडी टाळण्यासाठी ठाणे वाहतूक पोलिसांनी हे बदल केले आहेत. त्यासंदभार्ची अधिसूचना पोलिसांनी प्रसिद्ध केली आहे. येथील वाहने क्रिकनाका, उर्जिता उपाहारगृह येथून ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालय, जीपीओ मार्गे प्रवास करतील. साकेत मार्गे सिडकोच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांना टीएमटी आणि एनएमएमटीच्या बसगाड्यांना राबोडी वाहतूक उपविभाग कार्यालय येथे प्रवेशबंदी असेल. ठाणे शहरातून कळवा उड्डाणपूलमार्गे नवी मुंबईत जाणाऱ्या खासगी, एसटी बसगाड्यांना कॅडबरी सिग्नल, गोल्डन डाईज नाका आणि खोपट सिग्नल येथे प्रवेशबंदी आहे. ही वाहने पूर्व द्रुतगती मार्गावरून कॅडबरी सिग्नल येथून कोपरी पूल, मुलुंड टोलनाका, ऐरोली मार्गे किंवा गोल्डन डाईज नाका, खारेगाव टोलनाका, पारसिक नाका मार्गे प्रवास करतील. गोल्डन डाईज नाका येथून जीपीओ मार्गे क्रिक नाका येथे वाहतूक करणाऱ्या चार चाकी, अवजड वाहने आणि मालवाहू वाहनांना गोल्डन डाईज नाका येथे प्रवेशबंदी असेल. येथील वाहने साकेत पूल, खारेगाव टोलनाका, पारसिक चौक मार्गे प्रवास करतील. तसेच ही वाहने कॅडबरी जंक्शन , कोपरी, मुलुंड टोलनाका, ऐरोली मार्गे देखील वाहतूक करू शकतात. हे वाहतूक बदल शुक्रवारी दुपारी १२ ते रात्री १२ पर्यंत लागू असतील. पोलीस वाहने, अग्निशमन दलाची वाहने, रुग्णवाहिका आणि इतर अत्यावश्यक वाहनांना ही अधिसूचना लागू नसेल असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

## कबुतरप्रेमींना मोठा धक्का! दाणापाण्यावर बंदी कायम; कोर्टाचा स्पष्ट आदेश



### आता सुप्रीम कोर्टात लढाई सुरू होणार?

मुंबई उच्च न्यायालयाने दादरमधील कबुतरखान्यावर बंदीचा निर्णय कायम ठेवल्यानंतर आता या आदेशाविरोधात पुढची पायरी सर्वोच्च न्यायालयात नेली जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कबुतरांना दाणापाणी देण्यास पुन्हा परवानगी मिळावी, यासाठी कबुतरखाना सुरू ठेवण्याचे समर्थक सुप्रीम कोर्टाचं दरवाजा ठोठावणार का, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. आता पुढील लढाई उच्च न्यायालयातून थेट सर्वोच्च न्यायालयात जाणार का, याबाबत उत्सुकता वाढली आहे.

**■मुंबई । प्रतिनिधी,**

मुंबईतील दादर येथील प्रसिद्ध कबुतरखाना गेल्या काही दिवसांपासून मोठ्या वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. मुंबई महापालिकेने आरोग्याचा मुद्दा लक्षात घेऊन या कबुतरखान्यात कबुतरांना दाणापाणी देण्यावर बंदी घातली होती. या निर्णयामुळे जैन समाजाने तीव्र नाराजी व्यक्त करत आक्रमक भूमिका घेतली होती. हे प्रकरण थेट मुंबई उच्च न्यायालयात पोहोचले. मात्र आता न्यायालयाने महापालिकेच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करत कबुतरखाना बंदच ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे कबुतरप्रेमींसाठी ही मोठी निराशा ठरली आहे, तर दुसरीकडे आरोग्याच्या दृष्टीने हा निर्णय योग्य मानला जात आहे. या प्रकरणात पुढील टप्प्यावर काय घडते, याकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. आरोग्य अधिक महत्त्वाचं कबुतरखान्यावर बंदी कायम

दादरमधील कबुतरखान्याच्या वादावर अखेर मुंबई उच्च न्यायालयाने आपला स्पष्ट निर्णय दिला आहे. न्यायालयाने यापूर्वी दिलेला कबुतरखान्यावर बंदीचा आदेश कायम ठेवत सांगितलं की, नागरिकांचे आरोग्य आमच्यासाठी सर्वोच्च आहे.

यासोबतच कोटार्ने स्पष्ट इशारा दिला की, या आदेशाचा कोणीही अवमान करू नये. जर कोणा पक्षकाराला निकालावर हरकत असेल, तर त्यांनी कायदेशीर मागार्चा अवलंब करावा. आमच्या निर्णयाचा अवमान न करता, न्यायालयीन पर्याय उपलब्ध आहेत, त्यांचा वापर करा, असं ठामपणे न्यायालयाने म्हटलं आहे. या निकालामुळे आता कबुतरखान्याच्या विरोधात असलेल्यांना दिलासा मिळाला आहे, तर समर्थकांच्या नाराजीला नवे वळण मिळण्याची शक्यता आहे.

## डॉक्टरांपेक्षा एक रुपया अधिक पगार पाहिजे; आत्मसन्मानासाठी मुंबईचे 'सफाई कर्मचारी' सरसावले!

**■मुंबई । प्रतिनिधी,**



शहराला स्वच्छ आणि निरोगी ठेवण्यात सफाई कर्मचारी महत्त्वाची भूमिका बजावतात, तरीही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या या कर्मचाऱ्यांना कमी पगार आणि खराब जीवनशैलीचा सामना करावा लागत आहे. सध्याच्या आर्थिक अस्थिरतेने त्यांची नाराजी आणखी वाढवली आहे. ज्याचा परिणाम त्यांच्या कुटुंबीयांवर आणि मुलांच्या शिक्षणावर होत आहे. या अत्यावश्यक कर्मचाऱ्यांसाठी अधिक मजबूत पाठिंबा आणि संसाधनांची गरज आता पूर्वीपेक्षा अधिक तीव्र झाली आहे.

मुंबईसारख्या महानगरात स्वच्छतेची जबाबदारी खांद्यावर घेतलेले मनपाचे सफाई कर्मचारी आता केवळ झाडू न मारता, अन्यायाविरोधात आवाजही उठवत आहेत. विभागाच्या खासगीकरणाविरोधात यशस्वी लढा देणाऱ्या या कामगारांच्या अनेक मागण्या अजूनही अपूर्ण आहेत. 'सेक्युलर मूव्हमेंट' या चळवळीच्या कार्यकर्त्यांनी नुकतेच महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांची भेट घेऊन त्यांच्या जीवनमान सुधारण्यासाठी महत्त्वाच्या मागण्यांचे निवेदन सादर केले. या मागण्या म्हणजे केवळ पगारवाढ नाही, तर त्यांचा आत्मसन्मानही आहे. सफाई कामगारांनी मागणी केली आहे की, त्यांचा पगार सरकारी डॉक्टरांपेक्षा किमान एक रुपया अधिक असावा. त्यांच्या मुलांना शिक्षणाच्या पात्रतेनुसार मनपामध्ये कायमस्वरूपी नोकऱ्या मिळाव्यात, अशीही जोरदार मागणी त्यांनी केली आहे. याशिवाय त्यांनी राहण्यासाठी घरे, आधुनिक साधने, आणि दर तीन वर्षांनी वेगवेगळ्या विभागात बदल होणारी कामकाज पद्धती लागू करण्याचा आग्रह धरला आहे.सध्याच्या आर्थिक अस्थिरतेने त्यांची नाराजी आणखी वाढवली आहे.

ज्याचा परिणाम त्यांच्या कुटुंबीयांवर आणि मुलांच्या शिक्षणावर होत आहे. या अत्यावश्यक कर्मचाऱ्यांसाठी अधिक मजबूत पाठिंबा आणि संसाधनांची गरज आता पूर्वीपेक्षा अधिक तीव्र झाली आहे. त्यांच्या मागण्यांमध्ये, कर्मचाऱ्यांनी महापालिका आयुक्तांना असा आग्रह केला आहे की, आपल्या मुलांना अनुकंपा तत्त्वावर सफाई कर्मचारी म्हणून नोकरी मिळावी अशीही त्यांची मागणी आहे. या गटाने एक सुधारित धोरण लागू करण्याची मागणी केली आहे, ज्यामुळे त्यांच्या मुलांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार महानगरपालिकेत नोकरी मिळू शकेल. याव्यतिरिक्त, ते योग्य घरे, आधुनिक साधने आणि दर तीन वर्षांनी सफाई कर्मचाऱ्यांची वेगवेगळ्या पालिका कार्यालयांमध्ये बदली करण्याची धोरण लागू करण्याची मागणी करत आहेत.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# अपरिपक्व युवराज

'मी राजा नाही, मला देशाची सेवा करायची आहे, असं दोन दिवसांपूर्वी दिल्लीतील एका कार्यक्रमामधील लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचं वक्तव्य. या वक्तव्यामुळे काँग्रेस कार्यकर्ते सुखावले असतील. आपण कसं संविधान वाचविण्याचा प्रयत्न करतोय, लोकशाहीची मूल्य जपतोय, हे दाखविण्याचा राहुल गांधींकडून नेहमीच प्रयत्न असतो. भारत जोडो यात्रेनंतर जणू काही देशातील १४० कोटी जनता आपल्या पाठीशी असल्याचा त्यांना भास झाला होता. त्यातील काही वादग्रस्त वक्तव्यांची चचार्ही तेवढीच झाली. काही प्रकरणं न्यायालयात गेली. त्या प्रलंबित प्रकरणांचा अद्याप निकाल न लागल्याने त्यावर आत्ताच भाष्य करणं उचित नाही. सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधी यांना ज्या शब्दांत फटकारलं, ते पाहता भविष्यात त्यांच्याकडून अशी वादग्रस्त विधाने होऊ नये, अशी अपेक्षा भारतीय नागरिकांकडून होत आहे. काय होते न्यायालयाचे बोल?. 'जर तुम्ही खरे भारतीय असाल, तर असं विधान होणार नाही. तुम्हाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे; पण त्याचा गैरवापर जबाबदार नेत्यांनी करू नये', 'तुम्ही लोकसभेचे विरोधी पक्षनेते आहात. तुमची मतं संसदेत मांडली गेली पाहिजेत, सोशल मीडियावर नव्हे', 'चीनने भारताचा दोन हजार चौरस किलोमीटर भूभाग गिळंकृत केला, हे तुम्हाला कसं कळलं? तुम्ही तिथे होतात का? काही विश्वासार्ह माहिती आहे का?', अशी सर्वोच्च न्यायालयाची टिप्पणी होती. २०२२ मध्ये 'भारत जोडो यात्रेदरम्यान भारतीय लष्कराबाबत राहुल यांनी हे अपमानकारक विधान केलं होतं. या वक्तव्यावरून त्यांच्या विरोधात याचिका दाखल झाली. या याचिकेवर खंडपीठाने तीव्र नाराजी व्यक्त करत त्यांची भूमिका जबाबदार नेत्यास शोभणारी नसल्याचं स्पष्ट म्हटलं. न्यायालयाच्या भाषेचा मान राखून यापुढे राहुलबाबा वादग्रस्त विधान करणार नाहीत, अशी अपेक्षा करायला हरकत नाही. राहुल गांधी हे आजच्या भारतात काँग्रेसच्या गांधी राजघराण्याचे युवराज या संज्ञेपलीकडे जाऊ शकले नाहीत, हे पुन्हा एकदा सिद्ध झालं. याचं कारण त्यांच्या विधानांतून राजकीय अपरिपक्वता, राष्ट्रहिताच्या विरोधात जाणाऱ्या टिप्पण्या दिसून आल्या. राहुल गांधी राजकारणात अद्यापही बालिश आहेत आणि त्यांची विधानं मनाला आनंद देण्याऐवजी हसू आणणारी असतात. त्याला आपण हास्यास्पद म्हणतो. भारताचं नेतृत्व करण्याचं दिवास्वप्न पाहणाऱ्या अशा या नेत्याने भारत जोडो यात्रेदरम्यान चीनने भारतीय भूमी बळकावल्याच्या केलेल्या दाव्यामुळे लष्कराचा अपमान झाला होता. चिनी सैनिक अरुणाचल प्रदेशात भारतीय जवानांना झोडपून काढत आहेत आणि प्रसारमाध्यमे त्यावर काहीही दाखवत नाहीत , ही राहुल गांधींची वक्तव्य राष्ट्राला क्लेषदायक आहेत. भारतीय लष्कराने या संदर्भात अधिकृत निवेदन जारी करून स्पष्ट केलं होतं की, आमच्या जवानांनी सीमाभागात घुसलेल्या चिनी सैनिकांना परखड प्रत्युत्तर दिलं आणि त्यांना परत पाठवलं. भारतीय लष्कराचा सन्मान करणाऱ्या कोणत्याही नागरिकाला अशा विधानामुळे त्रास होऊ शकतो. अभिव्यक्ती स्वातंत्र्याला एक मयार्दा असते. त्याच्या नावाने जे काही वाटेल ते बोलता येत नाही.₹ एका माजी पंतप्रधानांच्या वारसदाराने देशाच्या सीमेविषयी असे बिनबुडाचे, निराधार आणि खोटेपणानं भरलेली विधानं करणे, हे कितपत योग्य आहे, याचा त्यांनीच विचार करायला हवा. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी गेली ७८वर्षे काँग्रेस खोटी विधानं करत आहे. त्यात सावरकर माफीवीर असल्याचा आरोप महाराष्ट्राच्या भूमीत येऊन करायलाही राहुल गांधी मागे राहिले नाहीत. एके ठिकाणी त्यांनी म्हटलं होतं की, ₹भाजप आणि संघाने प्रत्येक संस्था ताब्यात घेतली आहे आणि आता आम्ही भाजप, संघ आणि भारतीय राज्याविरुद्ध लढत आहोत₹. त्यांच्या विधानाबाबत गुवाहाटीतील पान बाजार पोलीस ठाण्यात त्यांच्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला. अमेरिकेत राहुल यांना आरक्षणावरही प्रश्न विचारण्यात आला. तेव्हा त्यांनी देशातील प्रत्येकाला समान संधी मिळू लागेल, तेव्हाच काँग्रेस आरक्षण संपवण्याचा विचार करेल, असं विधान केलं. संविधान धोक्यात आल्याचं खोटं विधान करून लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने मतं मिळवली. तीच काँग्रेस आज आरक्षण संपवण्याची भाषा करत आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा विचार केला, तर राहुल गांधी यांची ही वक्तव्यं वेळोवेळी चीनला लाभदायक ठरत आहेत. डोकलाम संघर्ष, गलवान खोऱ्यातील हिंसाचार, तसंच अलीकडील सीमावाद या प्रत्येक प्रसंगी त्यांनी भारत सरकारच्या भूमिकेवर अविश्वास दर्शवला आणि प्रत्यक्षदर्शी पुराव्यांखेरीज मांडलेली मते ही अप्रत्यक्षरीत्या चीनच्या कृष्णनीतीला पोषक ठरली. त्यांच्या वक्तव्यातून सैन्याबद्दल अविश्वास आणि भारताची प्रतिमा मलीन करणारी वृत्ती दिसून येते. आज भारताला अशा नेतृत्वाची आवश्यकता आहे, जे राष्ट्रहितासाठी बोलेल आणि शत्रू राष्ट्रांविरोधात परखड भूमिका जनमत तयार करेल. राहुल गांधी यांची वक्तव्य आणि त्यांच्या राजकीय दिशा पाहता हे स्पष्ट होतं की, ते ना नेतृत्वक्षम आहेत, ना राष्ट्रनिष्ठा! भारतीय जनतेने अशा प्रकारच्या राजकीय तमाशांना आता पूर्णतः नाकारलं पाहिजे. त्यात आता सर्वोच्च न्यायालयाने चीनसंदर्भात विधानावरून फटकारलं आहे. त्याचा राहुल गांधी यांच्यावर काही परिणाम होईल, अशी शक्यता वाटत नाही. त्यांच्या आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या नकारात्मकता पसरविण्याच्या धोरणामुळं काँग्रेस पक्षाला भारतीय जनता गांभीयार्ने घ्यायला तयार नाही हे त्यांच्या कधी लक्षात यायचं ते येवो.

# तपासातले अपयश

कायद्याचे एक मूलभूत तत्त्व आहे, शंभर अपराधी सुटले तरी चालतील पण एकाही निरपराध्याला शिक्षा होता कामा नये! याच तत्त्वाचे पालन करत २००६ मध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोटातील बाराही आरोपींची पुराव्याअभावी मुक्तता केली. न्यायालयाने त्याची कारणेही दिली आहेत, त्याचे प्रमुख कारण आहे ते म्हणजे या आरोपींनी बॉम्बस्फोटाचा कट रचला हे सिद्ध करण्यात सरकार पक्ष साफ अपयशी ठरला! न्यायालयाने काही साक्षीदारांच्या साक्षींबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. न्यायालयाने सरकार पक्षावर कडक ताशेरेही ओढले आहेत. न्यायालयाच्या म्हणण्यानुसार, हे साखळी स्फोट असल्याचे सिद्ध करण्यास सरकार अपयशी ठरला आहे. न्यायमूर्ती अनिल किलोर आणि एस. एम. चांडक यांनी हा ऐतिहासिक निकाल देताना काही निरीक्षणे नोंदवली आहेत. ती कायद्याच्या अभ्यासूंनी अभ्यासण्यासारखी आहेत. त्यांनी म्हटले आहे की, ज्या साक्षीदाराने बॉम्ब जुळवताना पाहिले होते, तो १०० दिवस गप्प का राहिला? संशयित आरोपींना तुरुंगात ठेवण्यासाठी जी शेवटची मुदत आहे, तीही सरकार पक्ष पाळू शकला नाही. त्यामुळे, या खटल्यातील अनेक आरोपींनी १८ वर्षे गजाआड काढली आहेत. कोणत्याही न्यायतत्त्वात हे बसत नाही. २००६ च्या जुलैमधील सायंकाळी गर्दीच्या दिवशी १८९ लोक या भीषण बॉम्बस्फोटात ठार झाले, तर ८२७ जण जखमी झाले. सायंकाळी ऐन गर्दीच्या वेळेस खार, सांताक्रूझ, जोगेश्वरी, माहीम जंक्शन, मीरा रोड, भाईंदर आणि माटुंगा अशा ठिकाणी हे बॉम्बस्फोट झाले. यासाठी कोणत्या प्रकारची स्फोटके वापरण्यात आली हेही सरकार पक्ष सिद्ध करू शकला नाही. सरकार पक्षाच्या म्हणण्यात वैधता सिद्ध झाली नाही. तसेच आरोपींची जी ओळखपरेड झाली, तीही न्यायालयाने नाकारली. ती ओळखपरेड योग्य सक्षम अधिकाऱ्यासमोर झाली नाही, असे न्यायालयाचे म्हणणे आहे. खालच्या न्यायालयात सात जणांना फाशीची शिक्षा ठोठावली होती. पण आता त्या सर्व शिक्षा रद्द झाल्या आहेत. कोणत्याही खटल्यात ट्रायल कोर्टाच्या फाशीच्या शिक्षेला उच्च न्यायालयाकडून मंजुरी घ्यावी लागते. पण तीच सरकार पक्ष घेण्यात कमी पडला, हे यावरून सिद्ध होते. आता प्रश्न निर्माण होतो, की मग हे बॉम्बस्फोट घडवले कुणी आणि कोणत्या साधनाने? कारण इतके मृत्यू झाले, म्हणजे, कुणीतरी स्फोट घडवले असणारच. पण याच आरोपींनी ते घडवले आहेत, हे सिद्ध करण्यात सरकार पक्ष अपयशी ठरला असा याचा अर्थ आहे. न्यायमूर्ती चौधरी यांनी असा युक्तिवाद केला होता, की काही दिवसांच्या आतच काही आरोपींनी आपला छळ केला जात असल्याचा आणि दबाव आणला जात असल्याचा आरोप केला होता. एका आरोपीचे कोरोना काळात निधनही झाले. मुंबई उच्च न्यायालयाने वरील निकाल दिल्यानंतर, समोर येईल तो पुरावा ग्राह्य धरता येईल का? असा प्रश्न तपास यंत्रणांसमोर उभा राहिला आहे. मुंबई साखळी स्फोटातील सर्व आरोपीना निर्दोष सोडून दिल्याने आता न्यायदान प्रक्रियेवर आणि पोलिसांच्या तपास पद्धतीवर प्रश्न निर्माण झाले आहेत. पोलीस तपासात अनेक त्रुटी आढळल्या आणि या प्रकरणाची जटिलता पाहता उपलब्ध पुरावे पुरेसे नाहीत असे न्यायालयाने निरीक्षण नोंदवले आहे. त्यामुळे भारतातील न्यायदान प्रक्रिया आणि पोलीस तपासपद्धती संशयाच्या भोवऱ्यात आली आहे, असे म्हणावे लागेल. या खटल्यात १९२ साक्षीदार असतानाही मुंबई उच्च न्यायालयाने सर्व आरोपींना पुराव्याअभावी सोडून दिले. याची सर्वांनी आणि विशेषतः कायदेविषयक सेवेतल्या व्यक्तींनी जाणीव करून घ्यायला हवी. साक्षीदारांच्या जबाबात तथ्य आढळले नाही आणि स्फोटात बॉम्ब कोणते वापरले होते, हे सांगण्यात साक्षीदाराना अपयश आले. या खटल्याच्या निकालातून एक सिद्ध होते ती बाब, म्हणजे न्यायमूर्ती पुरावा ठोस असेल तरच ग्राह्य धरतात. कोणताही अभिनिवेश तेथे चालत नाही. जे सत्य असेल, तेच न्यायालय ग्राह्य धरते. १९ वर्षांनंतर आता हा निकाल आला आहे. देशाचा न्यायसंवर्धनेवर विश्वास यामुळे मजबूत होईल का? आरोपींनी कबुलीजबाब द्यावा म्हणून आरोपीचा छळ केला होता, असे आरोपींचे म्हणणे न्यायालयाने ग्राह्य धरले. या सर्व प्रकरणात एटीएसची भूमिका संशयास्पद राहिली. काही वेळा राजकीय पक्ष सरकारवर दबाव आणून आणि न्यायव्यवस्थेवर दबाव टाकून आरोपींची मुक्तता करण्यासाठीही प्रयत्न करतात. इतिहासात पूर्वी असे अनेकदा घडले आहे. काही बाबतीत लोकांना एका विशिष्ट समाजाबद्दल प्रेम किंवा तिरस्कार वाटतो आणि त्यातून न्यायव्यवस्थेवर दबाव वाढत जातो आणि न्यायाधीशही मग लोकांना आवडेल असाच निकाल देतात. सर्वच न्यायाधीश असे नसतात; पण काहींबाबत चर्चा होते. व्यवस्था शरण न्यायमूर्तींमुळे असे निकाल प्रभावित होता. पण न्यायमूर्ती चांडक आणि न्या. किलोर यांचे कौतुक करायला हवे. त्यांनी कोणत्याही दबावाला किंवा लोकभावनेला बळी न पडता आपला निकाल दिला आणि १२ आरोपींना आरोपमुक्त केले. कोणत्याही न्यायव्यवस्थेने कायद्याच्या चौकटीत राहून आणि पुराव्याच्या आधारे निकाल दिला पाहिजे.न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य आणि कायद्याचे पालन यात महत्त्वाचे आहे. आता प्रश्न उरतोच, की मग बॉम्बस्फोट केले कुणी? त्यासाठी तपास यंत्रणांना आणखी तपास करावा लागेल आणि खरे उत्तर शोधावे लागेल. त्याशिवाय कायदाप्रेमी शांत बसणार नाहीत आणि ज्यांचा जीव गेला, त्यांच्याही आत्म्याला तोपर्यंत शांती मिळणार नाही.

# तरुणाईला बरबाद करणाऱ्या डान्सबारचे आश्रयदाते कोण!



मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी 2 ऑगस्ट रोजी पनवेलमध्ये झालेल्या शेकापच्या 78 व्या वर्धापनदिनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या रायगडमध्ये सर्वाधिक डान्सबार कसे, असा प्रश्न उपस्थित करून सत्ताधार्यांना लक्ष्य करणारा नवा बॉम्ब टाकला. हा मुद्दा खूप गंभीर असून याकडे नेहमी दुर्लक्ष केले जाते. पनवेल आणि परिसर डान्सबारसाठी ओळखला जातो. ही ओळखच पनवेल आणि रायगड जिल्ह्याची बदनामी आहे, असे कुणाला न वाटणे हाच आपला लाचारपणा आहे. नेमका हाच मुद्दा राज ठाकरे यांनी चर्चेत आणल्याबद्दल त्यांचे खरोखरच कौतुक करायला हवे. एकट्या पनवेल तालुक्यात तब्बल 24 डान्सबार आहेत, यावर कुणाचा विश्वास बसणार नाही. यावरून येथील वास्तव लक्षात येऊ शकेल. इथे कोणकोणते धंदे होत असतील, याची कल्पनाच केलेली बरी. बरे हे सर्व ऑर्केस्ट्राच्या नावाखाली होत आहे. आणि हे सर्व सुरू असताना आम्हाला यातील काहीच माहीत नाही असे जर पोलीस, उत्पादन शुल्क विभाग, सरकारी अधिकारी आणि लोकप्रतिनिधी म्हणत असतील तर जनता मूर्खांच्या नंदनवनात वावरत आहे, असे खेदाने म्हणावे लागेल.

राज ठाकरे यांनी डान्सबारच्या मुद्याला हात घातल्यानंतर अवघ्या 12 तासात संतप्त महाराष्ट्र सैनिकांनी एका बारवर हल्ला केला, दगडफेक करत बारच्या काचा फोडल्या. सातजणांना अटक करण्यात आली आणि त्यांची कोटार्ने जामिनावर सुटका केली. गंभीर बाब या डान्सबारच्या बाजूला गोल्डन नाईट बार आहे. हा बार सेंट झेवियर्स इंग्लिश स्कूलला लागून आहे. मग या बारला परवानगी देताना कोणत्या नियमानुसार दिली, याचे उत्तर उत्पादन शुल्क, पोलीस खाते यांनी द्यायला हवे. तिथे आधी बार आला की शाळा बांधली यावर उहापोह होता कामा नये. बार आणि शाळा बाजूबाजूला कशा नांदतात, विद्यार्थ्यांना आधी बारचे दर्शन होते आणि नंतर शाळा दिसते, हे वास्तव पाहायचे असेल तर पनवेल तालुक्यातील मुंबई-पुणे महामार्गालगत कोन गावात आवर्जून जा!

महाराष्ट्रात डान्सबार बंदी व्हावी, अशी मागणी ज्या तालुक्यातील आमदाराने केली त्याच तालुक्यातील ही व्यथा आहे. डान्सबारसाठी पनवेल तालुक्यासह रायगड जिल्हा बदनाम होत चालला आहे, याची खंत आपल्या राज्यकर्त्यांना अजिबात वाटत नाही. नाव शिवछत्रपतींचे घ्यायचे आणि त्याच रायगड जिल्ह्यात डान्सबारना आश्रय द्यायचा, हे कोणते धोरण आहे. त्याहून गंभीर बाब म्हणजे पालकमंत्रीपदाचे वेध लागलेल्या जिल्ह्यातील एका मंत्र्याने सर्वच ठिकाणी हिडिस फिडीस काही चालत नाही, असे वक्तव्य करून डान्सबारचे प्रकरण गंभीर नसल्याचे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

पनवेल तालुक्यातील बार आणि डान्सबार पूर्वीपासूनच कुप्रसिद्ध आहेत. याच डान्सबारमुळे तरुण पिढी बरबाद होत आहे, त्यांचे कुटुंब उद्ध्वस्त होत आहे, हे लक्षात आल्यानंतर शेतकरी कामगार पक्षाचे तत्कालीन आमदार विवेक पाटील यांनी विधिमंडळात डान्सबार बंदीचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर तत्कालीन गृहमंत्री आर. आर. ऊर्फ आबा पाटील यांनी त्यांच्या मागणीनुसार 2006 मध्ये राज्यात डान्सबार बंदी कायदा लागू केला. लाडक्या बहिणींचे संसार देशोधडीला लागण्यापासून वाचवण्यासाठी डान्सबार बंदी लागू झाली असली तरी आजही छुप्या पद्धतीने डान्सबार सुरू असल्याची खुली चर्चा आहे.

विशेष म्हणजे डान्सबार बंदी उठवण्यासाठी तेव्हा जोरदार कोर्टकचेर्या झाल्या. अखेर सर्वोच्च न्यायालयाने अनेक अटींसह परवानगी देण्यात आली. मात्र, कायद्यातून पळवाटा अधिक निघतात आणि त्याचा गैरफायदा घेतला जातो. आजमितीला एकट्या पनवेल तालुक्यात खारघरपासून अगदी पळस्पे, कोनपर्यंत तब्बल 24 पेक्षा जास्त डान्सबार असल्याची माहिती आहे. तर रायगड जिल्ह्यात तब्बल पाचशेहून अधिख बार आहेत. डान्सबार बंदीपूर्वी एकट्या मुंबईत 700 डान्सबार आणि 75 हजार बारबाला होत्या. ही आकडेवारी खूप धक्कादायक आहे. डान्सबारमधील छमछम आणि या रात्रीच्या दुनियेतील व्यवहार वेगळे आहेत. पनवेल तालुक्यातील बार आणि डान्सबार अगदी पुणे, पश्चिम महाराष्ट्रापर्यंतच नाही तर अगदी गुजरातपर्यंत सर्वांना ठावूक आहेत.

संध्याकाळी निघायचे आणि पनवेल तालुक्यातील डान्सबारमध्ये यायचे रात्रभर छमछम केल्यानंतर पुढे एक्स्प्रेस वेने पुन्हा परत जायचे, असा अनेकांचा ह्यसामाजिक उपक्रमह्ण असतो. पनवेल तालुक्यातील बार तसेच डान्सबारवर अनेकदा पोलिसांची कारवाई होते. पोलीस कधी कधी छापेमारी करतात. अश्लील वर्तन करणाया महिलांना तसेच बारमधील कर्मचार्यांना पकडले जाते. नंतर काही महिन्यांनंतर पुन्हा कारवाई झाल्याची बातमी येते. अशा पद्धतीने ह्यबार बारह्ण पोलिसांची कारवाई सुरूच असते. या पार्श्वभूमीवर छत्रपती शिवाजी महाराजांच्या रायगडमध्ये सर्वाधिक डान्सबार कसे? या राज ठाकरे यांच्या प्रश्नाने हा मुद्दा ऐरणीवर आला आहे. तसेच शाळेशेजारी राजरोसपणे बार सुरू असेल तर परवानगी देताना नक्कीच अर्थपूर्ण व्यवहार होत असावा, हे वास्तव समोर येते. त्यामुळेच महाराष्ट्रातील तरुण पिढी बरबाद करणाया या डान्सबारकडे सरकारने कानाडोळा करू नये, हिच अपेक्षा.

# माणसांनी बदललेला श्रावण!

अजूनही धार्मिक बाब म्हणून श्रावण पाळणारे बरेच आहेत. खाणे-पिणे तर बदललंच पण निसगार्चा तालही बदलतोय. मी म्हणालो. प्रोफेसर म्हणाले, जास्त खाणं हा जसा हावरेपणा आहे, तसंच माणसाने सुखसोयींसाठी हावरेपणा करून निसगार्चा तोल बिघडवला. नवलकर म्हणाले, हो, यंदा मे महिन्यांत आषाढासारखा पाऊस झाला आणि श्रावण जून-जुलैला झाला. मी म्हणालो, श्रावणाच्या रम्य चित्रात झाडांना झुले बांधले जात. मुलं तर फांद्या अन पारंब्यावरही लोंबकळत. तात्या म्हणाले, असे वृक्ष आता शहरात कुठे आहेत? गावातही नवी लागवड होत नाही.



बालकवींची श्रावणमासी, हर्ष मानसी ही कविता शाळेत शिकलो, तेव्हापासून ते आजपर्यंत असा एकही श्रावण आला नाही की जेव्हा या कवितेची आठवण झाली नाही. किती सुंदर वर्णन आहे. ऊन-पावसाचा खेळ, सप्तरंगी इंद्रधनुष्य, बलाकमाला, ढगांवरचे संध्याराग, सोनचाफा, केवडा, पारिजात, हे सर्व आठवून श्रावण म्हटला की मन कसे आधीच प्रसन्न होऊ लागते. मी मनापासून बोललो. नवलकर म्हणाले, आजूबाजूला सगळ्या उंच इमारतींतून इंद्रधनुष्य राहू द्या, पण त्याचा कोपराही पाहिला नाही कित्येक वर्षं. प्रोफेसर म्हणाले, तो इंद्रधनुचा दुहेरी गोफ पहायला आता तरुणाई हरिश्चंद्रगडावर जाते. तात्या म्हणाले, आणि काही धांदल करणारे विधानसभेच्या आवारात एकमेकांच्या कानाखाली आवाज काढून इंद्रधनुष्याचे रंग एकमेकांना दाखवायचा प्रयत्न करताहेत. तात्या म्हणाले. त्याला विधानभवन ऐवजी अमक्यातमक्याचा आखाडा म्हणायला पाहिजे. श्रावण म्हटले की मला प्रथम गैरसमजामुळे दशरथाच्या बाणाला बळी पडलेला श्रावण बाळ आठवतो. नवलकर दुःखी चेहरा करत म्हणाले.

मी म्हणालो, मला तरी श्रावणात बालपणीच्या आठवणी येतात. सणवाराचा महिना. पहिला दिवस जर सोमवार आला तर पहिल्याच दिवशी शाळा अर्धा दिवस. सकाळची शाळा दहालाच सुटायची. मग शाळेतून आल्या आल्या आईने खास केलेला धोंडस, पोळे, इ. पदार्थ खायचा. बाबलीबाई अजून करते पण माझ्या नातवाला हवी असते मॅगी. जाहिराती पहातात आणि मुलं हट्ट धरून बसतात. तात्या म्हणाले, पूर्वीच्या श्रावणातल्या पदार्थांचे कौतुक आम्हालाच. नातवंडं सोडा, मुलं आणि सुनासुध्दा बाहेरून बिर्याणी मागवतात. श्रावणाचे सोपस्कार बायकोलाच. प्रोफेसर म्हणाले, पूर्वी पावसाळ्यात आरोग्याची काळजी घ्यायला खाण्या-पिण्यावर बंधन घालावी लागत. ती या सणवाराच्या निमित्ताने घातली जात. जे पचायला जड असतं ते श्रावणात टाळायला सांगितलं आहे. मांस आणि दुग्धजन्य पदार्थ टाळावेत, असे म्हणतात. फळे खावीत. उपवासाचे पदार्थ उत्तम. पाण्यातील आर्द्रता वाढते व पचनशक्ती थोडी कमी होते. हे यामागचं एक कारण. जंतुसंसगार्ची शक्यता वाढते. आता जशी टीबायोटीक्स आहेत, स्वच्छतेची काळजी घ्यायच्या सोयी आहेत, त्या पूर्वी नव्हत्या. तेव्हा आधीच पथ्य पाळलेलं बरं. अजूनही धार्मिक बाब म्हणून श्रावण पाळणारे बरेच आहेत. खाणे-पिणे तर बदललंच पण निसगार्चा तालही बदलतोय. मी म्हणालो. प्रोफेसर म्हणाले, जास्त खाणं हा जसा हावरेपणा आहे, तसंच माणसाने सुखसोयींसाठी हावरेपणा करून निसगार्चा तोल बिघडवला. नवलकर म्हणाले, हो, यंदा मे महिन्यांत आषाढासारखा पाऊस झाला आणि श्रावण जून-जुलैला झाला. मी म्हणालो, श्रावणाच्या रम्य चित्रात झाडांना झुले बांधले जात. मुलं तर फांद्या अन्‍ पारंब्यावरही लोंबकळत. तात्या म्हणाले, असे वृक्ष आता शहरात कुठे आहेत? गावातही नवी लागवड होत नाही. नवलकर म्हणाले, सोसायटीच्या बागेत लावलेले कृत्रिम झुलेसुध्दा मुलं क्वचित वापरताना दिसतात. उभं राहायला आलं की आई-बाप बॅट हातात देतात. सर्वांना क्रिकेटर व्हायचय. बरोबर आहे. झुल्यांना कोण विचारतो? ज्यांना झुलायचंय ती मोठी माणसं पिऊन तर होऊन झुलतात. इति तात्या. प्रोफेसर म्हणाले, परवा एक व्हिडिओ पाहिला. काही गावांतील मुलांना अजून झुल्याचे पूल ओलांडून शाळेत जावं लागतं. श्रावणातले हौसेने बांधलेले झुले आणि हे गरज म्हणून बांधलेले झुले. पावसाळा गेला की नदी, नाले रोडावतात आणि हे झुले वापरावे लागत नाहीत.

मी अजून कवितेत रमलो होतो. कुरणं, त्यात बागडणारी हरणे, खिल्लारं, कधीकाळी पाहिलेली आठवत होती. पुन्हा मला नवलकरांनी वर्तमानात खेचलं, बगळे आणि करढोक विसरा आता. चिमणी दिसली तरी आनंद माना. नाहीतर कबुतरं आहेत बारमाही. प्रोफेसर म्हणाले, कुरणं म्हणजे काय, हे मुलांना कसं सांगणार आतां? कुठे आहेत अशी कुरणं. सगळ्या जमिनींवर बिल्डर आणि डेव्हलपर म्हणवर्णायांनी कब्जा केलाय. सिमेंटचं जंगल म्हणजे मुंबई, असं झालंय. जगभर अनेक शहरांमध्ये मोकळ्या जागा आणि इमारतींनी व्यापलेली जागा याचे प्रमाण असते. लंडनमध्ये वीस टक्के जागा बागांसाठी राखीव आहेत तर एकूण पन्नास टक्के जागा उघडी म्हणता येईल अशी आहे. मुंबईमध्ये ती साडेसहा टक्के आहे आणि बागांसाठी राखीव जागा फक्त दीड टक्का आहे. तात्या म्हणाले, कोकणात अद्याप परिस्थिती बरी आहे, पण बिघडायला वेळ नाही लागणार. रेल्वे झाली, आता सुधारणेच्या नावावर सिमेंटची घरं येतील. नवलकर मला म्हणाले, तुमची ही कविता आऊटडेटेड झाली आहे. त्यात मुली फुलं गोळा करतात म्हटलंय ना! आता कुंडीत लावलेल्या झाडांची फुलंसुध्दा चोरीला जाताहेत.

तात्या म्हणाले, त्या प्रसन्न वदनाने देवळात जार्णाया ललनाही नाही राहिल्या बरं कां? आता श्रावणातही लोकल पकडायला धावर्णाया स्त्रीयांना देवळात जायला वेळही नाही आणि आवडही नाही. मी चिकाटी सोडली नाही. मी म्हणालो, तात्या, तरीही बाजारात सोनचाफा असतो विकायला, गजरेवाला रस्त्यावर असतो आणि हौशी स्त्रिया त्यातल्या त्यात आनंद मानून घेतातच. कधी त्या पोराला मदत म्हणून तर कधी हौस म्हणून! श्रावण हे एक निमित्त आहे. मान्य आहे की श्रावण खूप बदललाय पण त्यातली नित्याचं जगणं साजरं करण्याची प्रवृत्ती महत्त्वाची आहे. प्रोफेसर म्हणाले, पूर्वी श्रावणाच्या निमित्ताने स्त्रीयांना उत्साह येई. मग गणपती, मग दसरा-दिवाळी, असं चक्र चालूच रहायचं. आजच्यासारखी साधनं स्वयंपाकगृहात नसताना भरपूर शारीरिक कष्ट करून त्या इतरांना प्रोत्साहित करत. तेव्हा श्रावण वेगळाच असे. नागपंचमीला नागाच्या टोपल्या घेऊन गारुडी येत असत. मजा यायची बघायला. नवलकर म्हणाले. त्यावर तात्या म्हणाले, नवलकर, कोकणात चला की साप पहायला. ते गारूडी पैसे गोळा करायला सर्पांचे हाल करत असत. आता कायद्याने बंदी आलीय त्यावर आणि ती बरोबरच आहे. प्रोफेसर म्हणाले, सर्कशीतील जनावरांपासून फिरते अस्वलवाले, माकडवाले, नागवाले, इ. सगळे गेले. माणूस आपल्या करमणुकीसाठी आणि पैसे कमविण्यासाठी त्यांना नैसर्गिक स्थितीत राहू देत नसे. मला ते गाणे आठवले, चल ग सये वारूळाला..नागोबाला पूजायाला. मी म्हणालो. श्रावणातले बाकीचे सण आकसले किंवा गेले पण कृष्णजन्मानंतरचा दहिकाला मात्र जास्तच उत्साहात साजरा होऊ लागलाय. उत्तरेत नाच आणि महाराष्ट्रात दहीहंडी. तात्या म्हणाले, आता परवानगी घ्यायला लागते. कारण गर्दी खूप होते. नवलकर म्हणाले, गर्दी होते कारण मोठ-मोठे कलाकार हजेरी लावतात. प्रोफेसर म्हणाले, गर्दी असते म्हणून कलाकार येतात आणि कलाकार येतात म्हणून गर्दी होते, असा प्रकार आहे तो. मात्र श्रावण बदलत आहे, हे नक्कीच.

# परदेशात फिरायला जायचंय? 10 हजारात थायलंडमध्ये काय-काय करता येईल




आजकाल भारतीयांमध्ये परदेशवारीची आवड खूप वाढली आहे. थायलंड हे भारतीय पर्यटकांसाठी एक लोकप्रिय ठिकाण बनले आहे, खासकरून तिथले सुंदर समुद्रकिनारे, स्वच्छ परिसर आणि पारंपारिक बौद्ध मंदिरांमुळे. पण तुम्हाला माहीत आहे का, जर तुम्ही १०,००० रुपये घेऊन थायलंडला गेलात तर तिथे तुम्ही काय-काय करू शकता? चला, थायलंडमधील खर्च आणि तिथल्या चलनाचा भारतीय रुपयाशी काय संबंध आहे, ते सविस्तरपणे समजून घेऊया.

थायलंडची अधिकृत मुद्रा थाई बाहट आहे, ज्याला संक्षिप्त रूपात टीएचबी म्हणतात. भारतीय रुपयाच्या तुलनेत थाई बा- हट जास्त मजबूत आहे. विनिमय दरानुसार, भारताचा १ रुपया थायलंडमध्ये सुमारे ०.३७ टीएचबीच्या बरोबर आहे. याचा अर्थ, तुमचे १०,००० रुपये थायलंडमध्ये फक्त ३,७५१.४९ टीएचबी होतील. हा विनिमय दर प्रत्येक ठिकाणी बदलतो, उदा. विमानतळावर जास्त शुल्क लागत असल्याने दर अधिक महाग असतो. त्यामुळे, पैसे बदलताना नेहमी योग्य ठिकाणाची निवड करणे महत्त्वाचे आहे.

**१०,००० रुपयांमध्ये थायलंडमध्ये काय कराल?**

जरी तुमचे १०,००० रुपये थायलंडमध्ये ३,७५१ टीएचबी होत असले, तरी तिथे राहण्याचा आणि खाण्याचा खर्च फार जास्त नाही. त्यामुळे कमी बजेटमध्येही तुम्ही चांगला आनंद घेऊ शकता.

राहण्याचा खर्च : थायलंडची राजधानी बँकॉक मध्ये तुम्ही २०० ते ५०० टीएचबी मध्ये एक रात्र गेस्ट हाउसमध्ये किंवा हॉटेलमध्ये राहू शकता. म्हणजेच, सुमारे १,००० रुपये प्रति रात्रीमध्ये तुम्ही चांगली जागा मिळवू शकता.

जेवणाचा खर्च : स्ट्रीट फूडसाठी तुम्हाला ६० ते ६५ टीएचबी खर्च येतो. याचा अर्थ, तुम्ही खूप कमी पैशांत पोटभर जेवण करू शकता, कारण तिथले स्ट्रीट फूड खूप चविष्ट आणि परवडणारे आहे.

फिरण्याचा खर्च : स्थानिक प्रवास आणि खरेदीसाठीही तुम्ही या पैशांचा वापर करू शकता. वाहतुकीसाठी तुम्हाला स्थानिक टॅक्सी, तुक-तुक किंवा मेट्रोसारखे पर्याय उपलब्ध आहेत. या आकडेवारीवरून हे स्पष्ट होते की, थाई बाहट (टीएचबी) भारतीय रुपया (आयएनआर) पेक्षा अधिक मजबूत आहे, पण थायलंडमध्ये राहण्याचा खर्च कमी असल्याने भारतीयांसाठी ते एक परवडणारे पर्यटन स्थळ आहे.

**थायलंडमध्ये भारतीय पर्यटकांची वाढती संख्या**

थायलंडच्या पर्यटन प्राधिकरणाच्या मते, २०२४ मध्ये २१ लाख भारतीय पर्यटकांनी थायलंडला भेट दिली. चीन आणि मलेशियानंतर भारत हा थायलंडसाठी तिसरा सर्वात मोठा पर्यटन बाजार बनला आहे, ज्यामुळे थायलंडच्या अर्थव्यवस्थेला मोठा फायदा होत आहे.

त्यामुळे, जरी तुमचा रुपया थायलंडमध्ये कमकुवत असला तरी, तिथे राहण्याचा आणि फिरण्याचा खर्च कमी असल्याने तुम्ही कमी बजेटमध्येही चांगली मजा घेऊ शकता आणि तुमची परदेशवारी अविस्मरणीय बनवू शकता.

# लांबचा प्रवास करण्यापूर्वी 'या' टिप्स जाणून घ्या

अनेकांना आपल्या मित्रांसोबत कारने लाँग ट्रिपवर जायला आवडतं. याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे ते वाटेत कुठेही थांबू शकतात किंवा प्लॅनमध्ये कोणतेही बदल ही करू शकतात. लांबच्या सहली मजेदार आहेत परंतु जर आपली कार आरामदायक नसेल तर थकवा देखील येऊ शकतो.

तासंतास गाडी चालवणे, पाठीमागे बसणे किंवा सामान पडून राहणे त्रासदायक ठरू शकते. परंतु, आपण इच्छित असल्यास आपली कार आरामदायक बनवू शकता. यासाठी तुम्हाला तुमच्या कारमध्ये कि र कोळ बदल करावे लागतील किंवा काही बदल करावे लागतील. यामुळे मित्रांसोबत प्रवासाचा आनंद घेता येईल. आपण काय केले पाहिजे हे जाणून घ्या.



गाडीत जेवढी बसण्याची जागा असेल तेवढ्याच लोकांना घेऊन जावे, हे लक्षात ठेवा. अनेकदा लोक गाडीच्या प्रवासी क्षमतेपेक्षा जास्त लोक बसतात, मग नंतर त्यांना त्रास होतो. जसे ५ सीटर कारमध्ये ६ लोक बसतात. यामुळे समोर २ लोक आरामात बसतील, पण मागे बसलेल्या ४ लोकांना त्रास होईल, विशेषतः लांबच्या प्रवासात. जर तुमच्याकडे ५ सीटर कार असेल तर ५ लोक किंवा ४ लोकांचे प्लॅनिंग करण्याचा प्रयत्न करा.

**बसण्याची पद्धत**

कारमध्ये सीट सर्वात महत्वाची असते. दीर्घ ड्राइव्हसाठी आपली ड्रायव्हिंग स्थिती योग्यरित्या समायोजित करा. अधिक आरामासाठी, आपण बॅक रेस्ट मानेच्या समर्थनासाठी सीटवर मानेची उशी ठेवू शकता. आपण मागच्या रहिवाशांसाठी लहान उशी ठेवू शकता किंवा मानेसाठी आधार कुशन ठेवू शकता. जेव्हा आपण झोपेत असता तेव्हा ते देखील कामी येतात.

**पायांना विश्रांती द्या**

वाहन चालवल्यामुळे किंवा लांबच्या प्रवासात बसल्यामुळे पाय सुन्न होऊ शकतात. त्यामुळे मध्येच थांबा आणि स्ट्रेचिंग करा. काही किलोमीटर गाडी चालवल्यानंतर विश्रांती घ्या. या दरम्यान तुम्ही चहा किंवा कॉफी पिऊ शकता किंवा काहीतरी खाऊ शकता. यामुळे तुम्हाला आराम मिळेल. तसेच गाडीच्या आतील तापमान ही खूप महत्त्वाची असते. एअर कंडिशनर (एसी) किंवा हीटर योग्य तापमानावर सेट करा. एसी किंवा हीटर सतत चालवू नका. खिडकी एकदा उघडा आणि ताजी हवा आत येऊ द्या. जर सूर्य प्रखर असेल तर तुम्ही कारच्या खिडक्यांवर, विशेषतः मागच्या सीटवर सनशेड लावू शकता.

**सामान व्यवस्थित ठेवा**

गाडीत सामान विखुरले असेल तर जागा कमी आणि त्रास जास्त होईल. छतावर लावलेल्या डिगी किंवा कॅरियरमध्ये पिशव्या ठेवा. पाण्याच्या बाटल्या, स्नॅक्स, फोन चार्जर इत्यादी आपल्याला आवश्यक असलेल्या वस्तूच ताबडतोब केबिनमध्ये ठेवा.

**करमणुकीची व्यवस्था**

लांबच्या प्रवासात कंटाळा दूर करण्यासाठी करमणूकही खूप महत्त्वाची असते. आपल्या आवडीची गाणी, पॉडकास्ट किंवा ऑडिओबुक्सची प्लेलिस्ट तयार ठेवा. आपण मुलांसाठी टॅब्लेट किंवा पोर्टेबल गेम डिव्हाइस देखील ठेवू शकता. हेडफोन नक्की ठेवा जेणेकरून कोणालाही त्रास होणार नाही.

# ऑगस्ट महिन्यात जोडीदारासोबत 'या' ठिकाणांना भेट देऊन तुमचा प्रत्येक क्षण बनवा एकदम खास

आजकालच्या रोजच्या त्याच धकाधकीच्या आयुष्यात आपल्या प्रियजनांसाठी वेळ काढणे थोडे कठीण होत चालले आहे. त्यामुळे तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत फिरायला जाण्याचा प्लॅन करू शकता. ऑगस्ट महिन्यात आपल्या भारतात काही ठिकाणे खूप सुंदर दिसतात. तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत ही ठिकाणे एक्सप्लोर करू शकता. ही ठिकाणे खूप सुंदर आणि गदीपासून दूर आहेत. तसेच निसर्गाच्या सानिध्यात तुम्ही छान वेळ घालवू शकता.

जेव्हा जेव्हा फिरायला जाण्याचा विचार करतो तेव्हा बहुतेक लोकं हिमाचल आणि उत्तराखंडला जाण्याचा विचार करतात. पण तुम्ही आपल्या भारतात असलेल्या या ठिकाणी देखील जाऊ शकता. येथे तुम्हाला एकमेकांसोबत काही शांत क्षण घालवण्याची संधी मिळेल. चला त्या ठिकाणांबद्दल जाणून घेऊयात.




- **इगतपुरी** – इगतपुरी हे महाराष्ट्र राज्यातील नाशिक जिल्ह्यात असलेले एक अतिशय सुंदर हिल स्टेशन आहे. तुम्ही या ठिकाणाला भेट देण्याचा प्लॅन करू शकता. इगतपुरी हे मुंबईपासून सुमारे १५० किमी अंतरावर आहे. येथे तुम्हाला ट्रेकिंग करण्याची संधी मिळू शकते. इगतपुरीमध्ये त्रिंगलवाडी किल्ला, भातसा नदी खोरे, विल्सन धरण, कळसूबाई शिखर, विहिगाव धबधबा आणि धनगरवाडी धबधबा अशी सुंदर ठिकाणे आहेत जी एक्सप्लोर करू शकता.
- **चेरापुंजी** – मेघालयातील चेरापुंजी हे पाहण्यासारखे एक अतिशय सुंदर ठिकाणं आहे. येथे एक डबल डेकर लिविंग रूट ब्रिज आहे, जो रबराच्या झाडांच्या मुळांपासून बनवला आहे. याशिवाय, नोहकालिकाई धबधबा येथे खूप प्रसिद्ध आहे. मावसमाई गुहा हे येथील एक आकर्षक ठिकाण आहे. याशिवाय, तुम्ही येथे डावकी नदी, इको पार्क, मावसमाई धबधबा, डेंथलेन धबधबा, वाकाबा धबधबा आणि मावदक डिंपेप व्हॅली सारखी ठिकाणे एक्सप्लोर करू शकता.
- **कोडाईकनाल** – तामिळनाडूमध्ये स्थित कोडाईकनाल हे एक अतिशय सुंदर हिल स्टेशन आहे. धुक्याने झाकलेले टेकड्या आणि धबधबे हे नयनरम्य दृष्य अगदी सुंदर दिसते. येथे तुम्हाला गदीपासून दूर तुमच्या जोडीदारासोबत शांत वेळ घालवण्याची संधी मिळू शकते. तुम्ही येथे कोडाईकनाल तलाव, बेरिंगन तलाव, कोकर वॉक, ब्रायंट पार्क आणि पिलर रॉक ही ठिकाणे एक्सप्लोर करू शकता.
- **कूर्ग** – कुर्गला कोडगु म्हणूनही ओळखले जाते. हे कर्नाटकातील एक अतिशय सुंदर हिल स्टेशन आहे. तर हे ठिकाण त्याच्या नैसर्गिक सौंदयार्साठी ओळखले जाते. येथे तुम्ही दुबरे एलिफंट कॅम्प, मडिकेरी किल्ला, पुष्पगिरी वन्यजीव अभयारण्य, मंडलपट्टी व्ह्यू पॉइंट, इरुप्पू फॉल्स आणि हरंगी धरणाला भेट देऊ शकता.
- **अलेप्पी** – अलेप्पी हे केरळमधील एक अतिशय सुंदर ठिकाण आहे. ते त्याच्या बॅकवॉटर, हाऊसबोट्स आणि समुद्रकिनाऱ्यांसाठी खूप प्रसिद्ध आहे. येथे तुम्हाला हाऊसबोटमध्ये राहायला मिळते. अलेप्पुझा बीच, वेम्बनाड तलाव, कृष्णपुरम पॅलेस आणि मरारी बीच येथे खूप प्रसिद्ध आहेत. येथे तुम्ही चेट्टीकुलंगरा भगवती मंदिर आणि मुल्लाकल राजराजेश्वरी मंदिराला भेट देऊ शकता.



# लाँग वीकेंडवर 'ट्रॅव्हल प्लॅन्स' जोरात, 'या' शहरांमध्ये होतेय रेकॉर्ड बुकिंग

ऑगस्ट महिना नोकरदारांसाठी एक खास भेट घेऊन येत आहे. यंदा 15 ऑगस्ट (स्वतंत्रता दिवस) शुक्रवारी येत असल्याने, शनिवार आणि रविवार जोडून एक शानदार ह्यलाँग वीकेंडह्न उपलब्ध झाला आहे. कोणतीही अतिरिक्त रजा न घेता तीन दिवसांची सुट्टी मिळाल्याने अनेक जण आतापासूनच या दिवसांमध्ये फिरण्याची तयारी करत आहेत. लोकांनी आधीच आपले प्रवासाचे नियोजन सुरू केले असून, काही शहरांमध्ये हॉटेल बुकिंगमध्ये विक्रमी वाढ दिसून येत आहे. चला तर, जाणून घेऊया ह्यलाँग वीकेंडह्नसाठी कोणत्या शहरांमध्ये सर्वाधिक बुकिंग होत आहे.

- **पावसाळयात बदलल्या प्रवासाच्या आवडी** : सहसा, 'लाँग वीकेंड'ला लोक 'हिल स्टेशन' म्हणजेच थंड हवेच्या ठिकाणी जाण्यास प्राधान्य देतात. पण यावर्षी मॉनसूनचा जोर आणि सततच्या पावसामुळे अनेक जण डोंगराळ भागांमध्ये जाणे टाळत आहेत. त्याऐवजी, पावसापासून बचाव करण्यासाठी लोक मैदानी आणि शहरी ठिकाणांकडे वळत आहेत, जिथे पावसाचा जोर कमी असतो किंवा फिरण्यासाठी सोयीस्कर असते. 'रिपोर्ट्स'नुसार, राजस्थान आणि दक्षिण भारतातील काही शहरांना या वेळी अधिक पसंती दिली जात आहे.
- **या शहरांमध्ये होतेय रेकॉर्ड बुकिंग** : नुकत्याच आलेल्या एका अहवालानुसार, उदयपूर (राजस्थान), कँडोलिम (गोवा) आणि लोणावळा (महाराष्ट्र) या शहरांमध्ये हॉटेल बुकिंग सर्वाधिक होत आहे. याशिवाय, म्हैसूर, महाबळेश्वर, हैदराबाद आणि बेंगळुरू ही शहरे देखील लोकांच्या पसंतीस उतरली आहेत. ही शहरे केवळ सुंदर नाहीत, तर तिथे पोहोचणेही सोपे आहे, ज्यामुळे प्रवासाचा थकवा कमी होतो.
- **उदयपूर ( राजस्थान )**: हे 'तलावांचे शहर' म्हणून ओळखले जाते, जिथे कामाच्या ताणातून मुक्त होऊन शांत आणि निसर्गरम्य वातावरणाचा आनंद घेता येतो.
- **कँडोलिम ( गोवा )** : समुद्रकिनाऱ्यांवर प्रेम करणाऱ्यांसाठी हे एक उत्तम ठिकाण आहे.
- **लोणावळा ( महाराष्ट्र )**: मॉनसूनमध्ये येथील हिरवीगार निसर्गरम्यता आणि धबधब्यांचा आनंद घेता येतो.
- **म्हैसूर**: हे भारताचे सांस्कृतिक आणि ऐतिहासिक शहर आहे आणि एक लोकप्रिय पर्यटन स्थळ आहे. महाबळेश्वरः पश्चिम घाटात वसलेले हे एक सुंदर थंड हवेचे ठिकाण आहे, जिथे तुम्ही तुमचा 'लाँग वीकेंड' एन्जॉय करू शकता.
- **हैदराबाद** : हे शहर खाण्यापिण्यासाठी आणि 'नवाबी' अंदाजानुसार फिरण्यासाठी प्रसिद्ध आहे.
- **बेंगळुरू** : हे 'वीकेंड गेटवे'साठी (वीकेंडला बाहेर फिरायला जाण्यासाठी) आणि आल्हाददायक हवामानासाठी ओळखले जाते.
- **अजून प्लॅन केला नसेल, तर उशीर करू नका** : एका अहवालानुसार, ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात हॉटेल बुकिंगमध्ये ४१% पर्यंत वाढ झाली आहे. याचा अर्थ, अनेकांनी आधीच त्यांच्या आवडत्या ठिकाणी हॉटेल बुक केली आहेत. त्यामुळे, जर तुम्ही अजूनही १५ ऑगस्टच्या 'लाँग वीकेंड-'साठी कोणताही 'ट्रिप प्लॅन' (प्रवासाचे नियोजन) केला नसेल, तर अजिबात उशीर करू नका! दिल्ली-एनसीआरमधील लोक जयपूर, ऋषिकेश, मसुरी किंवा नैनीतालचा प्लॅन करू शकतात. महाराष्ट्रातील लोक लोणावळा, खंडाळा किंवा महाबळेश्वरला भेट देऊ शकतात. तर, दक्षिण भारतातील लोक म्हैसूर, ऊटी, दुर्ग किंवा बेंगळूरुजवळील ठिकाणे शोधू शकतात. महत्त्वाचे म्हणजे, हॉटेल बुकिंग आधीच करून घ्या, अन्यथा ऐनवेळी जागा मिळणे कठीण होईल. हवामानानुसार कपडे आणि आवश्यक सामान सोबत ठेवा आणि पावसाळ्यामुळे वाहतूक किंवा फ्लाइटमध्ये उशीर होण्याची शक्यता लक्षात घेऊन थोडा लवचिक रहा.

# वाराणसीपासून फक्त 100 किमी अंतरावर असलेल्या 'या' ४ सुंदर धबधब्यांना एकदा नक्की द्या भेट

उत्तराखंड

वाराणसी शहर ज्याला कोणी बनारसी किंवा काशी असेही म्हणतात. हे एक प्राचीन शहर असल्याने याला इतिहास आहे. तसेच हे एक महादेवाच्या श्रद्धेचे शहर आहे. येथे काशी विश्वनाथ मंदिर, संकटमोचन मंदिर अशी अनेक प्रसिद्ध मंदिरे आहेत. वाराणसीला आल्यावर येथील गंगा नदीच्या काठावर बसल्यावर तुम्हाला मनःशांती मिळते. याशिवाय तुम्हाला गंगा आरती पाहण्याची संधी मिळते. तर १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या या शहरात भगवान शंकराचे हे शहर इतके खास आहे की ते शब्दात वर्णन करता येत नाही. वाराणसीतील काशी विश्वनाथ मंदिराव्यतिरिक्त, तुम्ही इतर अनेक मंदिरांना भेट देऊ शकता. याशिवाय, दशाश्वमेध घाट, अस्सी घाट, रामनगर किल्ला आणि मणिकर्णिका घाट आहेत. याशिवाय तुम्ही येथील निसर्गाच्या सानिध्यात जाऊ इच्छित असाल तर वाराणसीपासून १०० किमी अंतरावर असलेल्या या सुंदर ठिकाणांना भेट देऊ शकता. येथील निसर्गाचे सौंदर्य वाढवणाऱ्या धबधब्यांना नक्की भेट द्या. चला तर मग आजच्या या लेखात आपण वाराणसी मधील काही खास सुंदर धबधब्यांबद्दल जाणून घेऊयात...

**लखनिया हिल्स आणि धबधबा, मिर्झापूर**

वाराणसीपासून लखानिया हिल्स आणि धबधब्याचे अंतर सुमारे ५० ते ५५ किमी आहे. हे एक खूप सुंदर ठिकाण आहे. लखानिया दारी हा उत्तर प्रदेशातील मिझार्पूर जिल्ह्यातील अहरौरा जवळ असलेला धबधबा आहे. वाराणसीजवळ भेट देण्यासाठी हे सर्वात प्रसिद्ध ठिकाण आहे. सुमारे १५० मीटर उंचीवरून तलावात कोसळणारा हा धबधबा खुप सुंदर दिसतो. पडते. या ठिकाणी येणे तुमच्यासाठी खूप रोमांचक असू शकते. तसेच पिकनिक आणि ट्रेकिंगसाठी हे एक उत्तम ठिकाण आहे. धबधब्यातून पडणारे पाणी आणि आजूबाजूची हिरवळ मनाला शांत करते आणि फोटोग्राफीसाठी देखील हे एक उत्तम ठिकाण आहे.

**देवदरी धबधबा**

वाराणसीपासून ७० ते ७५ किलोमीटर अंतरावर असलेल्या देवदरी धबधब्याला तुम्ही भेट देऊ शकता. राजदरी आणि देवदरी धबधबे चंद्रप्रभा वन्यजीव अभयारण्याचा एक भाग आहेत. जिथे तुम्हाला अनेक प्रजातींचे प्राणी आणि पक्षी पाहायला मिळतील. याशिवाय, नाश्ता आणि जेवणासाठी येथे अनेक दुकाने आहेत. येथे तुम्हाला निसर्गाच्या सान्निध्यात वेळ घालवण्याची संधी मिळू शकते.

**वाराणसीहून राज राणी धबधबा**

वाराणसीपासून सुमारे ६० किमी अंतरावर चंदौली जिल्ह्यात असलेल्या राज राणी धबधब्याला तुम्ही भेट देऊ शकता. हे एक उत्तम पिकनिक स्पॉट आहे. जर तुम्हाला कुटुंबासह पिकनिकला जायचे असेल तर तुम्ही इथे जाऊ शकता. हा धबधबा गर्दीपासून दूर शांत ठिकाणी आहे. तसेच आजूबाजूला हिरवळ आहे.

**तांडा धबधबा, मिर्झापूर**

तांडा धबधबा मिर्झापूरच्या तांडा गावात आहे. तो वाराणसीपासून सुमारे ७५ किमी अंतरावर आहे. हा धबधबा घाघरा नदीची उपनदी असलेल्या तांडा नदीवर आहे. हे वाराणसीजवळील सर्वात प्रसिद्ध आणि सुंदर पर्यटन स्थळांपैकी एक आहे. तसेच हे एक लोकप्रिय पिकनिक स्पॉट आहे. तुम्ही येथे फिरायला देखील जाऊ शकता. शहराच्या गदीर्पासून दूर, तुम्हाला येथे एक ताजेतवाने वातावरण मिळेल.



# हरिद्वारला फिरायला जाताय? तर तेथील 'या' प्रसिद्ध मंदिरांना द्या भेट

उत्तराखंड मधील धार्मिक शहर असलेले हरिद्वार हे केवळ तीर्थक्षेत्र नाही तर आत्म्याला शांती देणारे ठिकाण आहे. गंगेच्या काठावर वसलेले हे शहर हिंदू धर्मात मोक्षाचे प्रवेशद्वार मानले जाते, जिथे दरवर्षी लाखो भाविक स्नान करण्यासाठी येत असतात. अशातच हरिद्वारचा उल्लेख होताच, हर की पौडी आणि गंगा आरती प्रथम लक्षात येते. परंतु हे पवित्र शहर केवळ गंगेत स्नान करण्यापुरते मर्यादित नाही.

हरिद्वार आणि त्याच्या आसपास अनेक प्राचीन आणि चमत्कारिक मंदिरे आहेत, जिथे दर्शन घेतल्याने जीवनातील समस्या दूर होतात आणि आत्म्याला शांती मिळते. जर तुम्हीही हरिद्वारला जात असाल तर फक्त हर की पौडी येथेच थांबू नका. तर त्याच्या जवळील काही मंदिरांनाही भेट द्या. चला तर आजच्या या लेखात आपण हरिद्वारला गेल्यावर कोणती मंदिरे आहेत आणि ती कुठे आहेत. ते आजच्या लेखात जाणून घेऊयात...




**मनसा देवी मंदिराला भेट द्या**

मनसा देवी मंदिर खूप लोकप्रिय आहे. असे म्हटले जाते की येथे तुम्ही जी इच्छा व्यक्त कराल ती पूर्ण होते. हे मंदिर शिवालिक टेकड्यांवर वसलेले आहे. येथे पोहोचण्यासाठी रोपवे ने जावे लागते. तर तेथील दृश्य खूपच अद्भुत आहे, जे तुमचा प्रवास आणखी संस्मरणीय बनवेल.

**चंडी देवी मंदिराला द्या भेट**

हे मंदिर नीलकंठाच्या दिशेने नील पर्वतावर स्थित देवी चंडीला समर्पित आहे. असे म्हटले जाते की देवी चंडीने येथे शुंभ-निशुंभ या राक्षसांचा वध केला. येथे अनेक भाविक दर्शन घेण्यासाठी आणि इच्छा व्यक्त करण्यासाठी येतात. हे मंदिर खूप उंचावर असल्याने येथे पोहोचण्यासाठी रोपवे ने जावे लागते. त्यामुळे येथून तुम्हाला संपूर्ण हरिद्वार पाहता येते.

**दक्ष महादेव मंदिर**

दक्ष महादेव मंदिर हे भगवान शिवाला समर्पित आहे. हे मंदिर हरिद्वारच्या कंखल परिसरात आहे. असे म्हटले जाते की येथील यज्ञात सतीने स्वतःला अग्नीला समर्पित केले होते. येथे शिवभक्तांच्या दर्शनासाठी रांगा नेहमीच असतात. हे मंदिर भोलेनाथच्या भक्तांसाठी श्रद्धेचे केंद्र आहे.

**भारत माता मंदिर खास आहे**

भारत माता मंदिर देखील खूप खास आहे. हे मंदिर 8 मजल्याचे बांधलेले आहे. त्याची खासियत अशी आहे की ही मंदिरे वेगवेगळ्या धर्मांना, महापुरुषांना आणि भारताच्या शूर पुत्रांना समर्पित आहेत, जिथे त्यांचे पुतळे देखील ठेवलेले आहेत. हे मंदिर देशभक्ती आणि धमार्चा एक अनोखा संगम आहे.

**माया देवी मंदिर**

हरिद्वारचे हे एक प्राचीन शक्तीपीठ आहे, जे सती देवीच्या तीन प्रमुख पीठांपैकी एक मानले जाते. माया देवीला हरिद्वारची अधिष्ठात्री देवता देखील म्हटले जाते. नवरात्र आणि कुंभमेळ्यादरम्यान हे मंदिर विशेषतः भाविकांनी भरलेले असते.

# चोंबडेपणा करायला कुणी सांगितला, दिबा पाटील सर्वपक्षीय कृती समितीचा पनवेल महापालिकेला संतप्त सवाल





**■नवी मुंबई । प्रतिनिधी,**

नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळावरून पहिले टेकऑफ सप्टेंबरमध्ये होईल, असे सांगण्यात येते. विमानतळाचे महिनाभरात उद्घाटन होणार असल्याने येथे कामाची प्रचंड लगबग दिसत आहे. या विमानतळाचा उल्लेख आजही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि त्याच नावाची कंपनी आहे. मात्र, अनेक वर्षांपासून या विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी होत असताना आणि केंद्र सरकार सकारात्मक असताना पनवेल महापालिकेने लावलेल्या नव्या दिशादर्शक फलकावरून स्थानिक संतप्त झाले आहेत. हा चोंबडेपणा करायला कुणी सांगितला, असा संतप्त सवाल दिबा पाटील सर्वपक्षीय कृती समितीने केला आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी खूप जुनी आहे. त्यासाठी महाविकास आघाडीने राज्याचा प्रस्ताव मंजूर करून केंद्राकडे पाठवला होता. महाविकास आघाडीचे सरकार गेल्यानंतर महायुती सरकारनेही विधिमंडळात प्रस्ताव मंजूर करून केंद्राला पाठवला होता. विमानतळाला दिबांचेच नाव देणार, हे सरकार वारंवार सांगत आहे. मात्र, तीन वर्षे झाली तरी सरकार तशी अधिसूचना काढत नसल्याने दिबा पाटील सर्वपक्षीय कृती समितीने अनेकदा नाराजी व्यक्त केली आहे. अशातच पनवेल महापालिकेने दिशादर्शक फलक लावल्याने आगीत तेल पडले आहे. विमानतळाला दि.बा.पाटील यांच्या नावाचे नोटिफिकेशन निघालेले नसताना पनवेल महापालिकेने दिशाभूल करून चोंबडेपणा करू नये, असे खडेबोल कॉ. भूषण पाटील यांनी सुनावले आहेत. ते दिबा पाटील सर्वपक्षीय कृती समितीचे सरचिटणीस आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला स्थानिक आणि प्रकल्पग्रस्तांनी लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची आग्रही मागणी केली आहे. त्यासाठी त्यांनी अनेकदा आंदोलने केली आहेत. तसेच नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापू राममोहन नायडू आणि विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची दिल्लीत भेटदेखील घेतली होती. त्यावेळी विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्यासाठी सरकार सकारात्मक असल्याचे त्यांनी सांगितले होते. तसेच राज्यमंत्री मोहोळ यांनी त्यानंतरही अनेकदा दिबांचेच नाव देणार असल्याचे सांगितले होते. याबाबत अजून केंद्र सरकारने अधिसूचना काढली नाही. असे असताना पनवेल महापालिकेने दिशादर्शक फलकावर नवी मुंबई विमानतळ असे नमूद केल्यामुळे दिबा पाटील सर्वपक्षीय कृती समिती संतप्त झाली आहे.

# घोडबंदर रोडवर डांबरीकरणाचे काम; ८ ते ११ ऑगस्ट दरम्यान वाहतूक बदल!



**■पनवेल। प्रतिनिधी:**

मिरा-भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत ठाणे- घोडबंदर रोड गायमुख घाटात ठाणे घोडबंदर वाहिनीवर रस्ता दुरुस्तीचे व डांबरीकरणाचे काम मिरा-भाईंदर महानगरपालिका दि. ०८/०८/२०२५ रोजी ००.०१ वाजले पासून ते दि. १०/०८/२०२५ रोजी ००.०० वाजे पर्यंत करणार आहेत. याकरिता वाहतूक अधिसुचनेद्वारे सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना घोडबंदर रोडवर दि. ०८/०८/२०२५ रोजी ००.०१ वाजले पासून ते दि ११/०८/२०२५ रोजी पहाटे ०५.०० वाजे पर्यंत प्रवेश बंद करण्यात आलेला आहे.

इतर हलकी वाहनांची रहदारी ही घोडबंदर ठाणे वाहिनी वरुन रॉग साईडने टप्या टप्याने मार्गस्थ करण्यात येणार आहे. सदर कामाच्या वेळी ठाणे घोडबंदर रोडवर गायमूख घाटात वाहतूक कोंडी होणार असल्याने नागरिकांनी ठाणे घोडबंदर रस्त्याच्या वापर टाळावा ही विनंती आहे. तसेच वरसावे पोलीस चौकी ते निराकेंद्र घाट (घोडबंदर रोड) असा कोणीही रॉग साईडचा वापर करु नये रॉग साईडचा वापर केल्यास कायदेशिर कारवाई करण्यात येईल. तसेच जास्त प्रमाणात वाहतूक कोंडी होऊन आपणांस इच्छित स्थळी पोहचण्यास विलंब होऊ शकतो.

तरी सर्व नागरिकांनी शक्यतो सदर रस्त्यावर प्रवास करण्याचे टाळावे किवा पयार्यी मागार्चा वापर करुन सहकार्य करण्याचे आपण सर्वांना आवाहन करण्यात येत आहे.

# फसवणुकीने घेतले ७९,०००, पण सायबर पोलिसांची तत्पर कारवाई; तक्रारदाराला पूर्ण रक्कम परत!

**■मिरा-भाईंदर। प्रतिनिधी:**

वसई-विरार:क्रेडिट कार्डची पेमेंट लिमिट वाढवून देण्याचे आमिष दाखवत एका नागरिकाची रु ७९,०००/- ची सायबर फसवणूक झाली होती. मात्र, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील सायबर पोलिसांनी तातडीने आणि प्रभावी कारवाई करत ही पूर्ण रक्कम परत मिळवण्यात यश मिळवले आहे.मिरारोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणारे तक्रारदार श्री. काकडे यांना एका अनोळखी व्यक्तीने मोबाईलवर लिंक पाठवून सांगितले की, त्यांच्या क्रेडिट कार्डची पेमेंट लिमिट वाढवली जाईल. तक्रारदारांनी सदर लिंकवर क्लिक करताच त्यांच्या खात्यातून रु ७९,०००/- ची रक्कम कपात झाल्याचा मेसेज प्राप्त झाला. त्यानंतर त्यांनी सायबर पोलिसांकडे तक्रार दाखल केली. ही तक्रार २८ जुलै २०२५ रोजी NCCRP पोर्टलवर (क्र. 31907250131049) नोंदवण्यात आली.

सायबर पोलिसांनी तात्काळ तपास सुरू करत रक्कम कुठे वर्ग झाली आहे याचा मागोवा घेतला. फसवणूक Online Ticket Booking अस्त्रस्त्र च्या माध्यमातून झाल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी त्या कंपनीसोबत त्वरित पत्रव्यवहार करून सलग तीन दिवस पाठपुरावा केला आणि अखेर रु ७९,०००/- ची पूर्ण रक्कम तक्रारदाराच्या मूळ खात्यावर परत करण्यात आली.

पोलिसांचा इशारा आणि नागरिकांना आवाहन:

सायबर पोलिसांनी नागरिकांना सतर्कतेचा इशारा देताना सांगितले आहे की:

बँक प्रतिनिधी कोणत्याही प्रकारे SMS/Call द्वारे तुमची वैयक्तिक माहिती मागत नाहीत.

1. अनोळखी लिंकवर कधीही क्लिक करू नये.
2. कोणत्याही अस्त्रस्त्र ची आधी पडताळणी करा आणि मगच डाऊनलोड करा.

फसवणूक झाल्यास तात्काळ बँक, पोलिस स्टेशन किंवा www.cybercrime.gov.in अथवा 1930/1945 हेल्पलाईन वर संपर्क साधावा.

ही कामगिरी केली:

सदरची कामगिरी श्री. संदिप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी सायबर पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर यांचेसह सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, पोउनि/वैभव धनवडे, मपोहवा/माधुरी धिंडे, मपोअं/सुवर्णा माळी, पोअं/राहुल बन, पोअं/सावन शेवाळे, मसुब राजेश भरकडे सर्व नेम सायबर पोलीस ठाणे यांनी पार पाडली आहे.

सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट www.cybercrime.gov.in

# कोस्टलसाठी पालिका ६ वर्षापूर्वीचा २७ कोटींचा पूल पडणार?



**■मुंबई। प्रतिनिधी:**

गेल्या काही वर्षांपासून मुंबईतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी अनेक पूल बांधण्यात आले. यामुळे मुंबई पालिकेने यासाठी कोट्यावधींचा खर्च केला. पण अनेकदा नुकतेच समोर आलेल्या माहितीनुसार, पालिकेने असाच कोट्यावधी खर्च करून पूल बांधला आणि आता तो पाडण्याची तयारी करत असल्याचे समोर आले आहे. मुंबई महानगरपालिकेने वसोर्वा-दहिसर-भाईंदर हा प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पासाठी गोरेगावचा वीर सावरकर उड्डाणपूल अडथळा ठरत आहे. अवघ्या ७ वर्षांपूर्वी बांधलेला २७ कोटींचा उड्डाणपूल पाडावा लागणार असून महापालिका प्रशासन त्यावर विचार विनिमय करत असल्याचे समोर आले आहे. पण, तसे झाल्यास त्याला मोठा विरोध होण्याची शक्यता आहे. मुंबई महापालिकेने म्हटले आहे की, गोरेगाव पश्चिमेतील वीर सावरकर उड्डाणपूल हा मुंबई कोस्टल रोड प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याच्या आड येत आहे, म्हणून तो पाडणे अत्यंत गरजेचे आहे. पण मालाडचे काँग्रेस आमदार अस्लम शेख यांनी पालिकेच्या या निर्णयावर आक्षेप घेतला आहे. या निर्णयाचा विरोध करताना ते म्हणाले की, हा जनतेच्या पैशांचा अपव्यय आहे. सरकार निवडणुकीआधी मुंबई महानगरपालिकेच्या निधीमधून शक्य तेवढे पैसे काढू इच्छित आहे. हा पूल पाडल्याने वाहतूक आणखी वाढण्याची शक्यता आहे. पालिकेने या निर्णयाचा पुनर्विचार करावा तसेच त्यासाठी दुसरा पर्याय शोधावा.ह अशी मागणी केली आहे. काही दिवसांपूर्वी शिवडी वरळी उन्नत मागार्साठी प्रभादेवीचा पूल पाडण्यावरून मोठा वाद निर्माण झाला होता. त्यानंतर आता या पुलावरूनही मोठा वाद होण्याची शक्यता आहे. मुंबई महापालिकेने सागरी किनारा मार्गाचा उत्तर मुंबईत जो भाग आहे त्याचे काम सुरू केले आहे. वर्सोवा ते दहिसर आणि पुढे भाईंदरपर्यंत हा मार्ग जाणार आहे. या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या आवश्यक त्या जमिनीचे संपादन वेगाने करावे, तसेच शासकीय जमीन हस्तांतरित करण्याची प्रक्रिया जलद गतीने करावी, असे निर्देश नुकतेच पालिका प्रशासनाने दिले आहेत. तसेच, किनारपट्टी नियमन क्षेत्राबाहेर असलेल्या भागामध्ये प्रत्यक्षात कामेही सुरू झाली आहेत. पण, आता या सागरी किनारा मार्गामध्ये गोरेगावमधील वीर सावरकर उड्डाणपुल अडथळा ठरू लागल्याचे मुंबई महापालिका प्रशासनाच्या लक्षात आले. गोरेगावमधील वीर सावरकर उड्डाणपूलाला एमटीएनएल उड्डाणपुल नावानेही ओळखले जाते. हा उड्डाणपूल रेडिसन हॉटेलपासून रुस्तमजी ओझोन परिसरापर्यंत आहे. या पुलाचे उद्घाटन २०१८ मध्ये करण्यात आले होते. हा पूल पाडून सागरी किनारा मार्ग प्रकल्पांतर्गत येथे दुमजली उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे. दुमजली पूलाचा वरील मार्ग मालाड माईंडस्पेसपासून दिंडोशी कोर्टापर्यंत पोहोचेल आणि त्याखालील मार्गिका वीर सावरकर उड्डाणपुलाची जागा घेईल.

# प्रांजल खेवलकरांच्या मोबाईलमध्ये महिलांचे नग्न फोटो, चाकणकरांनी केला खळबळजनक दावा

**■पुणे। प्रतिनिधी:**

राष्ट्रवादी काँग्रेस शदरचंद्र पवार पक्षाचे नेते एकनाथ खडसे यांचे जावई प्रांजल खेवलकर यांना पुणे पोलिसांनी रेव्ह पार्टी करताना रंगेहात पकडले होते. त्यानंतर मोठा वाद निर्माण झाला होता. प्रांजल खेवलकर यांच्यावर सतत वेगवेगळे गंभीर आरोप केले जात आहेत. धक्कादायक बाब म्हणजे पुण्यातील त्या रेव्ह पार्टीत प्रांजल खेवलकर आणि त्यांच्या मित्रांसोबत काही मुली देखील सापडल्या होत्या. यावरून आता या प्रकरणात राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी गंभीर खुलासा केला आहे. यामुळे या प्रकरणात आता नवीन खळबळ उडाली आहे.

रूपाली चाकणकर म्हणाल्या, लोणावळा, साकीनाका येथे खेवलकर यांच्या पाट्या झाल्या आहेत. महिलांना चित्रपटात काम देतो म्हणून बोलवून घेण्यात आले तिथे त्यांच्यावर अत्याचार करण्यात आला आहे. खेवलकर यांनी महिलांसोबत आपत्तीजनक चॅट केले आहे. त्यांच्या मोबाईलमधून 1 हजार 749 अधिक नग्न फोटो आणि व्हिडिओ सापडले आहेत. अमली पदार्थ देऊन महिलांवर अत्याचार करण्यात आला. हे सगळे फोटो आणि व्हिडिओ वापरून महिलांना ब्लॅकमेलही करण्यात आले असे गंभीर स्वरुपाचे दावे चाकणकरांनी केले आहेत.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर पुढे म्हणाल्या या मोबाईलमध्ये मोकरणीचे सुद्धा व्हिडिओ आणि फोटोज आहेत. अरुष नावाचा व्यक्ती हा मुली पुरवण्याचे काम करत होता. मुलींना चित्रपटात काम देण्याचे आमिष दाखवले जात होते. त्यातून मुलींचे लैंगिक शोषण करण्यात आले. या प्रकरणात मानवी तस्करी विरोधी पथक काम करत आहे, असे चाकणकर यांनी सांगितले. खेवलकर यांनी २८ वेळा रूम बुक केल्या आहेत. आरोपीचा मोबाईल, आर्थिक व्यवहार आणि मेलचा तपास करण्यात यावा, असही त्या म्हणाल्या.



**समोर येऊन तक्रार द्यावी, नाव गोपनीय ठेवण्यात येईल**

तसेच, ज्या मुलींचे लैंगिक शोषण झाले आहे त्यांनी समोर येऊन तक्रार द्यावी. त्यांचं नाव गोपनीय ठेवण्यात येईल. सर्व व्हिडिओ आणि फोटो हे प्रांजल खेवलकर यांच्या मोबाईलमधील आहेत. हे फार मोठे रॅकेट आहे. याचा एसआयटीच्या माध्यमातून तपास व्हावा, अशी मागणी चाकणकर यांनी केली आहे. तसेच, आर्थिक परिस्थिती बिकट असलेल्या मुलींचा वापर केला गेला. अनेक वर्षांपासून हे सर्व आरोपी एकमेकांच्या संपर्कात आहेत. लोणावळा, जळगाव, साकीनाका परिसरात ही सगळी प्रकरण सुरू होती, असे चाकणकर यांनी पत्रकार परिषद घेऊन सांगितले.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी पत्रकार परिषद घेऊन मोठा खुलासा केला आहे. पुण्यातील रेव्ह पार्टी प्रकरणात प्रांजल खेवलकर, निखील पोपटाणी, समीर फकीर मोहम्मद सय्यद, सचिन भोबे, श्रीपाद मोहन यादव तसेच त्यांच्यासोबत असलेल्या दोन महिला यांना पुणे पोलिसांकडून ताब्यात घेण्यात आले होते. पार्टीच्या ठिकाणाहून ४१ लाख ३५ हजार किमतीचे कोकेन, गांजा, दहा मोबाईल, हुक्का पॉट, दारुच्या बॉटल तसेच इतर अमली पदार्थ जप्त करण्यात आले, अशी माहिती चाकणकरांनी दिली. तसेच खेवलकर यांच्या पुण्यातील हडपसर येथील घरातून एक मोबाईल जप्त करण्यात आला, त्या मोबाईलच्या हिडन फोल्डरमध्ये महिलांसोबतचे संशयास्पद चॅटिंग, स्क्रीनशॉट, पाटीर्चे फोटो, अश्लील व्हिडीओ तसेच महिलांचे अर्धनग्न फोटो,सापडले आहेत असा खुलासा करण्यात आला.

# इंजिनिअर पतीचा घटस्फोटाचा दावा, पत्नीची मुलासाठी 30 लाखांची मागणी



**■पुणे। प्रतिनिधी:**

पतीने दाखल केलेल्या एकतर्फी घटस्फोटाच्या दाव्याला संमती देण्यापूर्वी पत्नीने स्वत:ऐवजी मुलाच्या भल्यासाठी पोटगी मागितली. पतीने मुलाच्या भवितव्याकरिता ३० लाख रुपये देण्याची तयारी दर्शवली अन् घटस्फोट घेतानाही पालकत्वाची जबाबदारी जपता येते, याचा समंजस वस्तुपाठ पुण्यातील दाम्पत्याने घालून दिला. सात वर्षांपूर्वी लग्न झालेल्या दाम्पत्यामध्ये मुलाच्या जन्मानंतर कुरबुरी सुरु झाल्या आणि त्यांनी वेगळं होण्याचा निर्णय घेतला. संवादातून सामोपचाराने न्यायालयीन वाद सोडविण्यासाठी आयोजित 'राष्ट्रासाठी मध्यस्थी' उपक्रमात या दाम्पत्याचा घटस्फोटाचा दावा परस्पर संमतीने निकाली निघाला.

**काय आहे प्रकरण?**

राज आणि प्रिया (नावे बदलली आहेत) यांचा २०१८ मध्ये विवाह झाला. राज अभियंता, तर प्रिया शिक्षिका आहे. उच्चशिक्षित आणि कमावत्या अशा या दाम्पत्याला लग्नानंतर वर्षभरात एक मुलगा झाला. मात्र, त्यानंतर या दाम्पत्यामध्ये खटके उडू लागले. एकमेकांशी पटत नसल्याने प्रियाने राजपासून वेगळे राहण्याचा निर्णय घेतला, तर राजने घटस्फोट घेण्यासाठी पुण्याच्या कौटुंबिक न्यायालयात अर्ज केला. पतीच्या वकील ॲड. जान्हवी देशपांडे-अधिकारी आणि ॲड. ऋतुजा खिवसरा यांनी त्याची बाजू मांडली. कौटुंबिक न्यायाधीश जी. जी. वायाळ यांनी हे प्रकरण मध्यस्थीसाठी ॲड. राणी कांबळे-सोनावणे यांकडे पाठविले. त्यांनी दाम्पत्याचे समुपदेशन केले. मात्र, या दाम्पत्याने एकमेकांपासून वेगळे राहण्याचा निर्णय आधीच घेतला होता. पतीपासून फारकत घेण्याची तयारी पत्नीने दर्शवली. मात्र, स्वत:साठी काही न मागता फक्त मुलाच्या भविष्यासाठी पोटगी मागितली. पालकत्वाच्या जबाबदारीचे भान असलेल्या पतीने मुलाच्या भविष्याची तजवीज म्हणून ३० लाख रुपये एकरकमी देण्याचे कबूल केले. मुलाचा ताबाही पत्न ीकडे देण्यास संमती दर्शवली.

# पंचशील ट्रस्ट ओरोस, आदर्श नगर, सिंधुदुर्ग यांच्या वतीने ठाणे येथे बौध्द समाजाच्या वधु - वर मेळाव्याचे आयोजन

**■मुंबई । प्रतिनिधी:**

पंचशील ट्रस्ट ओरोस, आदर्श नगर, सिंधुदुर्ग यांच्या वतीने वेगवेगळे स्तुत्य उपक्रम पार पाडण्यात येतात, त्याचाच एक भाग म्हणून रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या कोंकण विभागातील कामा निम्मित, उद्योगा निम्मित ठाणे, मुंबई आणि पनवेल अश्या ठिकाणी राहत असलेले बौध्द समाजाचे मुले - मुली व पालक यांच्यासाठी पंचशील ट्रस्ट च्या वतीने या मुलाचं भवितव्य व त्याचप्रमाणे जुळून येती रेशीम गाठी या माध्यमातून त्यांच्या आवडीचा जोडीदार मिळावा व आपले पुढील जिवन सुख समाधानाने व्यतीत करण्यात यावे या साठीचा छोटासा प्रयत्न आपण या ट्रस्ट च्या माध्यमातून करत आहोत. म्हणूनच दि. १५/०८/२०२५ रोजी सायंकाळी ५:३० ते ८:३० या वेळात मराठी ग्रंथसंग्रालय हॉल ठाणे जिल्हापरिषद कार्यालया समोर या मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमाला प्रमुख अथीती म्हणून आमचे धर्मगुरु मा. पूज्य भन्ते संघरत्न नवीमुंबई उपस्थित राहणार आहेत. त्याचप्रमाणे मा. वासुदेव तांबे, मा. अजित सोनावडेकर, मा. सुधाकर मोहिते, मा. अशोक जाधव मा. सिद्धार्थ जंगम, मा. वृंदा पेंडुरकर, मा. जगदीश कांबळे, मा. प्रतीक्षा नाईक, मा. समीक्षा कदम, मा. डी. एस. पराडकर, मा. श्रद्धा खोटलेकर व पंचशील ट्रस्ट अध्यक्ष मा. संजय खोटलेकर ( समाज भूषण महाराष्ट्र शासन ) हे मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत तरी या मेळाव्याचा कोंकण वासियांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आव्हान करत आहोत.

# सळई कोसळून जखमी झालेल्या युवकावर ५ तासांची शस्त्रक्रिया




**■भिवंडी। प्रतिनिधी:**

भिवंडी मेट्रो प्रकल्प ५ च्या कामाच्या ठिकाणी भिवंडीतील धामणकर नाका ते नारपोली हद्दीतून २२ वर्षीय युवक रमजान अली शेख हा साथीदारासह काम आटोपून प्रवासी रिक्षात बसून त्याच्या विठ्ठल नगर येथील राहत्या घरी जात असताना रिक्षा रतन टॉकीज जवळ आली. मेट्रोचे काम सुरू असलेल्या ठिकाणच्या ब्रिजवरुन अचानक सळई कोसळून रिक्षाच्या आरपार होवून युवकाच्या डोक्यात घुसून विचित्र अपघात घडला.यामध्ये युवक गंभीर जखमी झाला असून सुदैवाने त्याचे प्राण वाचले. त्यास तात्काळ येथील खासगी नोबल रुग्णालयात दाखल केले असून त्याच्यावर मंगळवारी रात्री तज्ञ डॉक्टरांच्या पथकाने तब्बल ५ तास शस्त्रक्रिया केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. तर शस्त्रक्रिये नंतर युवक बेशुद्ध अवस्थेत असल्याचे समजते. आणि हा युवक किती वेळेपर्यंत शुद्धीत येईल याची शाश्वती देवू शकत नसल्याची माहितीही सुत्रांनी दिली आहे. दरम्यान कंत्राटदार ॲफकॉन्स कंपनीच्या ठेकेदाराला या बेजबाबदार आणि ढिसाळ कारभाराच्या विरोधात एमएमआरडीएने ठेकेदारास ५० लाखांचा दंड ठोठावला असून या घटनेच्या चौकशी करिता स्वतंत्र कमिटी स्थापित करण्यात आली आहे. तसेच पर्यवेक्षणातील त्रुटींकरिता ५ लाखांचा दंडही ठोठावण्यात आला आहे.तर या घटनेप्रकरणी राजकीय विरोधी पक्षांनी कडाडून विरोध व्यक्त करून ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी लावून धरली आहे.त्यातच याप्रकरणी जखमी रमजानचा प्रत्यक्षदर्शी साथीदार अख्तर मूर्तजा अन्सारी (५५) याच्या फिर्यादीवरून सद्यस्थितीत अज्ञातांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर या घटनेचे तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक संदीप कांबळे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी या घटनेचा पंचनामा करून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून संबंधित घटनेच्या दोषी कर्मचारी, अधिकारी अथवा ठेकेदार यांच्यावर गुन्हा दाखल केला जाईल, अशी माहिती प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com